# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : २९९६/ मराठी भाषा समिती (ड-१७)**

**विधान भवन, मुंबई.**

**दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२२.**

**संदर्भ :** मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र.मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा -३, दि. १६ फेब्रुवारी, २०२२.

## :: परिपत्रक ::

कविवर्य श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून कवी कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो. तथापि, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी रविवार असल्याने या दिवशी शासकीय सुटटी आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विद्यमाने सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी "मराठी भाषा गौरव दिन" ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष पध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन करुन साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे चित्रीकरण सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२२ रोजी सत्ताधारी पक्ष दालन १० वा मजला , विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० ते सायं.५.०० वा.पर्यंत करण्यात येणार असून, त्याचे प्रक्षेपण दिनांक २८ फेब्रुवारी,१ व २ मार्च २०२२ रोजी या सचिवालयाच्या https://www.youtube.com/c/MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT/Playlists या यु टयुब चॅनेल वर करण्यात येणार आहे.

## :: कार्यक्रम ::

| सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२२ | | |
|---|---|---|
| **वेळ** | **कार्यक्रम** | **विषय** |
| सकाळी ११.३० ते ११.३५ वा. | उद्घाटन | कार्यक्रमाचे उद्घाटन मा.समिती प्रमुख, मराठी भाषा समिती यांच्या शुभहस्ते होईल. या सचिवालयाचे प्रधान सचिव कार्यक्रमासंदर्भात आपले विचार मांडतील. कार्यक्रमांतर्गत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मराठी भाषा मंत्री, मा.सांस्कृतिक कार्य मंत्री,मा.मराठी भाषा राज्यमंत्री, मा.सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा आणि दोन्ही सभागृहाचे मा.विरोधी पक्ष नेते यांचे शुभसंदेश/सदिच्छा यांचा समावेश करण्यात येईल. |
| सकाळी ११.३५ ते ११.४० वा. | ग्रंथपूजन | कवी कुसुमाग्रज आणि इतर थोर साहित्यिकांच्या साहित्य/ग्रंथसंपदेचे पूजन. "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी"हे मराठी अभिमान गीत ऐकविण्यात येईल. |
| सकाळी ११.४० ते ११.५० वा. | भाषण | मा.समिती प्रमुख, मराठी भाषा समिती यांचे मातृभाषेची महती आणि महिति यानुषंगाने विचार... |
| सकाळी ११.५० ते १२.०० वा. | व्याख्यान | श्री.हेमंत टकले, माजी वि.प.स. यांचे कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यावर व्याख्यान. |

| वेळ | कार्यक्रम | विषय |
|---|---|---|
| दुपारी १२.०० ते १.०० वा. | कथाकथन/ काव्यवाचन | या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे कथाकथन/काव्यवाचन |
| | | मध्यंतर (दुपारी १.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत) |
| दुपारी २.०० ते सायं. ५.०० वा. | मराठी लोकसाहित्य/लोककलांचे सादरीकरण ( सादरकर्ते : - या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी) | |
| | | अभंग, किर्तन, जोगवा, गवळण, भारुड, गोंधळ इत्यादी. |
| सायं. ५.०० वा. | कार्यक्रमाची सांगता | डॉ.अनिल महाजन, सह सचिव(समिती) तथा विशेष कार्य अधिकारी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आपले विचार मांडतील व कार्यक्रम संपल्याचे घोषित करतील. |

**सूत्र संचालन : श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.**

या कार्यक्रमाच्या सादरीकरणामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे नाव, पदनाम, सादरीकरणाचा प्रकार, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहितीचा तपशील मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडे दि.२४ फेब्रुवारी,२०२२ पर्यंत सादर करावा.

कार्यक्रमाच्या चित्रीकरण/सादरीकरणाच्यावेळी कोविड-१९ संदर्भातील नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

**( अनिल महाजन )**
**सह सचिव (समिती) तथा**
**विशेष कार्य अधिकारी,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रति:**

१.मा. समिती प्रमुख, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधिमंडळ.
२.महाराष्ट्र विधानसभेचे/विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.
३ मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
४. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी.
८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
९. विधिमंडळाची सर्व पक्ष कार्यालये.
१०. संगणक कक्ष (Website)
११. निवड नस्ती.